वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक–अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार–शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# बीडच्या घड्याळीत झाली बिघाडी

## डॉ.योगेश क्षीरसागरांनी केली जनता विकास आघाडी

**डॉ.योगेश क्षीरसागरांनी तडकाफडकी निर्णय घेत राष्ट्रवादीची सोडली साथ, आता बीडच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत येईल चुरस होईल तुतारी, घड्याळ, पतंग आणि योगेश क्षीरसागरांना मिळणाऱ्या चिन्हामध्ये लढत**

**डॉ.योगेश क्षीरसागरांना नको होते पटेल–नाईकवाडे–निजाम–मुळूक–शेख तय्यब**



Email:- dailydivyawarta@Gmail.com

Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

# राष्ट्रवादीचे संपूर्ण सुत्र हालणार आता पंडितांच्या शिवछत्रमधून

**आज सकाळपासून डॉ.योगेश क्षीरसागर यांनी प्रभाग १ ते प्रभाग २६ च्या सर्व इच्छुक उमेदवारांना बोलावून त्यांना आपला निर्णय सांगितला, माझ्या सोबत रहायचे असेल तर माझ्या आघाडीचे आणि संभावित भाजप युतीसोबत तुम्हाला लढावे लागेल, इच्छा असेल तर रहा नाही तर तुम्ही तुमचा निर्णय घ्या**



## डॉ.योगेश क्षीरसागर अन् राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उमेदवारी व नेतृत्वावरून गंभीर मतभेद निर्माण झाले; दोन्हीकडून स्वतंत्र रणनिती आखली जात आहे

बीड, (दिव्य न्युज):– आपल्या नेतृत्वाला आव्हान देणाऱ्यांना उमेदवारी नाही, निवडणुकीचे सूत्र द्यायचे तर ५२ नगरसेवकपदाचे आणि नगराध्यक्षदाचा असे सर्व ५३ उमेदवार आपणच ठरवू, अशा भूमिकेने सुरुवात करुन आता फार तर आठ उमेदवाऱ्या देऊ, इथपर्यंत आलेल्या डॉ. योगेश क्षीरसागरांचा ओढा आता भाजपसोबत हातमिळवणीचा असल्याची भावना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे पक्षानेही डॉ. क्षीरसागरांना वगळून ५२ नगरसेवक आणि नगराध्यक्षपदासाठी स्वतंत्र तयारी सुरु केली आहे.

नगराध्यक्षपद रिपाइंला देत शिवसेना आणि शिवसंग्रामला सोबत घेण्याची रणनीती राष्ट्रवादीच्या गोटात सुरु आहे. तर, इकडे डॉ. क्षीरसागर यांनीही नोंदणी असलेल्या जनता विकास आघाडीच्या माध्यमातून तयरी सुरु केली आहे. त्यांचीही भाजपसोबतही बोलणी सुरु असून भाजपचे चिन्ह किंवा आघाडी अशी त्यांची दुहेरी रणनीती सुरु आहे.

दोन्ही बाजूंनी बैठकांचे सत्र सुरु असून आज दिवसभरात मोठ्या घडमोडींची शक्यता आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार जिल्ह्याचे पालकमंत्री असल्याने ते यातून काय तोडगा काढतात, हे पाहणे औत्सुक्याचे आहे.बीडमध्ये नगरपालिका आणि क्षीरसागर हे मागच्या ३० वर्षांपासूनचे समीकरण आहे. यात सर्वाधिक काळ नगराध्यक्षपदावर राहण्याचा विक्रम डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांचा आहे. मागच्या वेळी त्यांच्याच घरात फुट पडली तरी उपनगराध्यक्षाच्या माध्यमातून अर्धी सत्ता क्षीरसागरांच्या घरातच राहिली होती.दरम्यान, आता डॉ. योगेश क्षीरसागर हे डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांचा वारसा चालवित असल्याने पक्षाची सर्व सूत्रे आपल्या हाती असावीत, अशी त्यांची मागणी आहे. मात्र, व्यक्ती म्हणजे पक्ष नव्हे, एकाच व्यक्तीला सर्वाधिकाराने पक्ष दुय्यम ठरतो, अशी भूमिका पक्षातील माजी नगरसेवकांच्या गटाने मांडत त्यांनी डॉ. योगेश क्षीरसागर यांच्याच नेतृत्वाला आव्हान दिले.

आता नगरपालिका निवडणुकीत आव्हान देणाऱ्यांना उमेदवारी नाही, अशी भूमिका डॉ. क्षीरसागर यांची आहे. मात्र, त्यांनी डॉ. क्षीरसागर यांना आव्हान दिले असले तरी ते पक्षाचे माजी नगरसेवक असल्याने त्यांना वाऱ्यावर सोडून कसे चालेल, अशी पक्षाची भूमिका आहे. यामुळे पक्ष व क्षीरसागर यांच्यातील वाटाघाटीला मूर्तरुप आलेले नाही. आता दोन्हीकडून ▶▶ पान २ वर

**डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अमरसिंह पंडित यांच्या विरूध्द वक्तव्य करून रोष ओढून घेतला होता तेव्हा पासूनच राष्ट्रवादीच्या घड्याळमध्ये बिघाडी झाली होती**

### बीड जिल्ह्यात भाजपला वातावरण पोषक



## पण पंकजा मुंडे, सुरेश धस यांची अद्याप बैठकच नाही!

बीड, (दिव्य न्युज):– बीड जिल्ह्यात यश मिळवून शतप्रतिशत भाजपा आणण्यासाठी राज्याच्या वरिष्ठ नेत्यांनी मंत्री पकंजा मुंडे यांना निवडणुक प्रभारी तर सुरेश धस यांच्यावर प्रमुख म्हणून जबाबदारी सोपवली आहे. राज्यात पक्षाला पोषक वातावरण असताना अद्याप पंकजा मुंडे–सुरेश धस यांच्यात बैठक झालेली नाही. दोघांमधील वाद–मतभेद अद्याप मिटलेले नाहीत. अशावेळी पक्षाने दोघांवर जबाबदारी टाकत त्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र तो फारसा यशस्वी झाल्याचे अद्याप तरी दिसत नाहीये. ▶▶ पान २ वर

## तहसीलदारांच्या पथकावर वाळू माफियांचा हल्ला! जीवे मारण्याचा प्रयत्न

कडा, (दिव्य न्युज):– तहसीलदार वैशाली पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाल्यानंतर सिना नदीपात्रात संगमेश्वर मंदिराजवळ (ता. आष्टी) अवैध गौण खनिज व वाळू उपसा सुरू असल्याच्या तक्रारीवर महसूल पथकाने छापा टाकला. या कारवाईत ५१ लाख ३४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यात एक विना नंबरची गाडी, स्वराज कंपनीचे तीन ट्रॅक्टर, एक ट्रॉली आणि ३० ब्रास वाळू यांचा समावेश आहे.

कारवाई दरम्यान वाळू माफियांनी पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. तलाठी सचिन विठ्ठल तेलंग यांच्या फिर्यादीवरून आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तहसीलदार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या छाप्यात तलाठी राजकुमार आचार्य, प्रविण शिंदे, स्नेहल थेटे, योगेश ▶▶ पान २ वर

### केजमध्ये मटका बुक्कीवर धाड

## 'मटका किंग'सह ५ जणांवर गुन्हा

केज, (दिव्य न्युज):– केज शहरातील मटका व्यवसायावर सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम यांच्या पथकाने कारवाई करत मोठी धाड टाकली. या कारवाईत 'मटका किंग' म्हणून ओळखले जाणारे गणेश खराडे व शेख चाँद यांच्यासह एकूण पाच जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कारवाईदरम्यान २१ हजार ३५० रुपये रोख रक्कम, तीन मोबाईल फोन, मोटारसायकल आणि जुगार साहित्य असा एकूण १,०६,३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अवैध मटका व्यवसायावर अंकुश ठेवण्यासाठी एएसपी व्यंकटराम यांनी १३ नोव्हेंबर रोजी त्यांच्या पथकाला विशेष कारवाईचे आदेश दिले होते. आदेशानुसार दोन पोलिस पथके तयार करण्यात आली. मंगळवार पेठ तसेच वसुंधरा बँकेच्या पाठीमागे दोन ठिकाणी एकाचवेळी धाड टाकण्यात आली. या धाडीत शिवराज भगवान पाटील, महेमूद शेख आणि उत्तम विश्वनाथ वाघमारे यांना ताब्यात घेण्यात आले.

चौकशीदरम्यान तिघेही ▶▶ पान २ वर

### ८५ जागा मिळूनही नितीश कुमार हतबल

## मुख्यमंत्रिपद मिळणार नाही?

### भाजपने पलटीचा विषयच संपवला,आरजेडी सोबत गणित जुळणे अवघड

दिल्ली, (वृत्तसेवा):– बिहार विधानसभेच्या निवडणुकी निकालात एनडीएची लाट आल्याचे दिसून येत आहे. २४३ जागा असलेल्या विधानसभेत तब्बल २०८ जागांवर एनडीएची आघाडीवर आहे. विशेष म्हणजे १०१ जागा लढणारी भाजप ९५ जागांवर आघाडीवर आहे. तर, १०१ जागा लढणाऱ्या नितीश कुमारांचा जेडीयू पक्ष ८५ जागांवर आघाडीवर आहे.नितीश कुमार यांच्या पक्षाला चांगले यश मिळाले ▶▶ पान २ वर



## लंपीने जनावरांचा मृत्यू

# खा.सोनवणेंनी केली नुकसान भरपाईची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

### मुख्यमंत्र्यांना दिले पत्र,९०० जणावरे लंपीने बाधीत



बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यात विविध भागात ९०० जणावरांना लंपी त्वचारोग बाधा झालेली आहे. यात ५८ जणावरांनाचा मृत्यू देखील झाला असून पशुपालक चिंतेत आहेत. या गंभीर स्थितीत प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने करून नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, सद्यस्थितीत बीड जिल्ह्यात लंपी त्वचारोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर झाला आहे. जिल्ह्यात शेकडो जनावरांना बाधा झाली आहे. आतापर्यंत ९०० जनावरे बाधित झाली असून ५८ जनावरांचा मृत्यू झालेला आहे. दरम्यान, ६३४ जनावरे उपचारानंतर बरी झाली आहेत. दरम्यान, ३,४१,१३५ जनावरांचे लसीकरण पूर्ण करण्यात आले आहे. या आजारामुळे शेतकरी वर्गावर मोठा आर्थिक परिणाम झाला असून, दूध उत्पादनात घट झाली आहे. अनेक ठिकाणी दुधाचे सेवन टाळण्याच्या सूचना देण्यात आल्याने दुग्धव्यवसायिकांनाही फटका बसत आहे. या पार्श्वभुमीवर, बाधित भागात पशुवैद्यकीय पथके वाढवून उपचार तातडीने सुरू ठेवावेत, लसीकरण मोहिमेला गती देऊन शंभर टक्के जनावरांचे लसीकरण पूर्ण करावे, बाधित व मृत जनावरांच्या मालकांना नुकसान भरपाई मंजूर करावी, जिल्ह्यातील पशुधन बाजार, दुग्धसंघ व डेअरी केंद्रांसाठी तात्पुरती मार्गदर्शक तत्त्वे लागू करावीत, तसेच जिल्हा प्रशासनास आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा. आपल्या हस्तक्षेपामुळे या परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यास निश्चित मदत होईल, असा विश्वासही खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केला आहे.शेतकरीपुत्राचे चौफेर लक्ष

बीड जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून लंपीचा प्रादुर्भाव वाढत आहे. यामुळे जनावरांचे मृत्यू देखील झालेले आहेत. शिवाय पशुपालकांचा मोठा खर्चही होत आहे. अशावेळी बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांनी या विषयाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. परंतु तसे होताना दिसत नाही. अशावेळी केवळ खा.बजरंग सोनवणे यांनी या विषयात लक्ष घालून आपले चौफेर लक्ष असल्याचे दाखवून दिले आहे.

# गेवराईत जनतेतून प्रथमच महिला नगराध्यक्षा

गेवराई, (दिव्य न्युज):- गेवराई नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर शहरातील राजकीय वातावरण तापले आहे. विशेष म्हणजे, यंदा नगराध्यक्ष पद खुल्या महिला प्रवर्गासाठी राखीव झाले असून या वेळी नगराध्यक्षा थेट जनतेतून निवडल्या जाणार आहेत. त्यामुळे शहरातील महिलांमध्ये नवचैतन्य, आत्मविश्वास आणि आनंदाची लहर उसळली आहे.

पूर्वी नगराध्यक्ष पदासाठी अप्रत्यक्ष निवडणुकीची पद्धत होती. मात्र आता थेट मतदान प्रक्रियेद्वारे महिला नगराध्यक्षा निवडल्या जाणार आहेत. या बदलामुळे नागरिकांना थेट नेतृत्व निवडण्याची संधी मिळाली असून महिलांना राजकारणात सक्रिय सहभागाचा मार्ग खुला झाला आहे. माधुरी बारटक्के यांनी सांगितले, महिलांना नेतृत्वाची ही संधी अत्यंत महत्त्वाची आहे. महिलांचा दृष्टिकोन संवेद नशील, नियोजनशील आणि व्यवहार्य असतो.

त्यामुळे नागरिकांच्या गरजा ओळखून विकास आराखडे तयार होण्यास मदत होईल. सुरेखा सुलाखे म्हणाल्या, आजच्या काळात महिला प्रत्येक क्षेत्रात नेतृत्व करत आहेत. नगराध्यक्ष पदावर महिला आल्यास शहराच्या प्रशासनात नव्या कल्पना, पारदर्शकता आणि लोकाभिमुखता येईल. दक्षा वानखेडे यांचे मत आहे की, ही वेळ महिलांनी केवळ सहभागी होण्याची नाही, तर नेतृत्वाची धुरा सांभाळण्याची आहे.

जनतेतून थेट निवडून येणाऱ्या महिला नगराध्यक्षा शहरासाठी प्रेरणादायी ठरतील. शहरातील नागरिकांचे म्हणणे आहे की, महिला नेतृत्वामुळे स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठा, शिक्षण, रस्ते विकास आणि महिलांच्या सुरक्षेसारख्या प्रश्नांवर अधिक ठोस व वास्तववादी निर्णय होतील. विविध महिला संघटनांनी या संधीचे स्वागत करत, शहराच्या विकासात महिलांचा सक्रिय सहभाग वाढवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. नगराध्यक्ष पद हे केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून शहराच्या भविष्यातील दिशादर्शनाचे स्थान आहे.त्यामुळे या वेळेस जनतेतून निवडून येणाऱ्या महिला नगराध्यक्षा गेवराई शहराच्या विकासात नवा दृष्टिकोन, संवेदनशीलता आणि कार्यसंस्कृती आणतील, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.शहरातील शिक्षित महिला, समाजसेविका, उद्योजिका आणि कार्यकर्त्या या नव्या संधीचा लाभ घेण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. स्थानिक प्रश्न, विकास आराखडे आणि नागरिकांच्या अपेक्षांवर चर्चा सुरू असून, महिलांमध्ये निवडणुकीबाबत जागरूकता आणि बांधिलकी दिसून येत आहे.

सध्या निवडणूक प्रक्रिया सुरू असून संभाव्य उमेदवार अर्ज दाखल करण्याच्या तयारीत आहेत. आचारसंहितेचे पालन करून पक्ष आणि कार्यकर्ते प्रचाराचे आराखडे आखत आहेत. नागरिकांमध्ये शांततेत, पारदर्शक पद्धतीने निवडणूक व्हावी, अशी भावना आहे.

## बैलचोरीचा बनाव अंगलट,बीडच्या वडवणीतील घटना

# तक्रार देणाराच निघाला आरोपी

बीड , (दिव्य न्युज):- मॅडम माझे बैल चोरीला गेले आहेत, अशी तक्रार घेऊन आलेल्याचा बनाव पोलिसांनी या प्रकरणात केलेल्या सखोल चौकशीत उघड झाला. अखेर बैलचोरीचा बनावच तक्रारदाराच्या अंगलट आल्याची घटना बीडच्या वडवणी पोलीस ठाण्याअंतर्गत उघडकीस आली. याप्रकरणी गुन्हा दाखल करून बनाव करणाऱ्यास अटक करण्यात आली आहे.

संपत निपटे व त्याचा भाऊ मदन निपटे यांच्या विरोधात वडवणी ठाण्यात पोलीस अंमलदार नितीन काकडे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सरकारतर्फे देण्यात आलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, सर्व परिस्थिती माहिती असतानाही पोलिसांचे कायदेशीर अधिकाराचा गैरवापर करण्यासाठी व पोलिसांना खोटी माहिती देवून त्यांची दिशाभूल करणे या कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक, नवनीत काँवत यांनी बीड जिल्ह्यात पदभार घेतल्यापासून खोट्या तक्रारीचे प्रमाण बहुतांश कमी झालेले आहे. यापूर्वी खोट्या तक्रारी देणाऱ्या तक्रारदारावर जिल्ह्यात गुन्हे झालेले आहेत. परंतु पुन्हा एकदा असा प्रकार वडवणी पोलीस ठाण्यात घडला.

१३ नोव्हेंबर रोजी संपत त्रिंबक निपटे व त्यांचे भाऊ त्रिंबक नीपटे (रा. पिंपरखेड) यांनी वडवणी पोलीस ठाण्यात त्यांचे दीड लाखाची बैल जोडी पंधरा दिवसांपूर्वी चोरी गेल्याची माहिती वडवणी पोलीस ठाण्याच्या सहायक निरीक्षक वर्षा व्हगाडे यांना दिली. इतके दिवस तुम्ही तक्रार देण्यासाठी का आला नाही? तुमच्या बैलजोडी संदर्भात काही आर्थिक व्यवहार आहे का? अशी विचारणा व्हगाडे यांनी वारंवार विचारणा करूनही तक्रारदार आपल्या मतावर ठाम होते. त्यानंतर पोलिसांनी संबंधित बैलजोडी संदर्भात तपासाची चक्रे फिरविली. त्यात बैलजोडी ही श्रीकांत चंद्रकांत मगर (रा. भावठाणा ता. आंबेजोगाई) या शेतकऱ्याकडे असल्याची गोपनीय माहिती मिळाली.



पोलिसांनी त्यास समक्ष पोलीस ठाणे येथे बैल जोडीसह आणले असता त्याने ही जोडी बाबाराव डाके (रा. टकारवाडी, ता. माजलगाव) याचेकडून विकत घेतल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी मध्यरात्री टकारवाडी येथे जावून बाबाराव डाके यांचेकडे चौकशी केली असता, त्याने ही बैल जोडी तक्रारदार संपत निपटे यास पैसे देऊन विकत घेतली, असे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी पुन्हा विश्वासात घेऊन तक्रारदाराची चौकशी केली असता त्यानेच हा बैलचोरीचा खोटा बनाव केल्याचे तपासात निष्पन्न झाले. तर श्रीकांत मगर यास ही बैलजोडी परत केली.

## डॉ. योगेश क्षीरसागरांची तिरकी चाल

# राष्ट्रवादीही क्षीरसागरांना वगळून नवा पॅटर्नच्या तयारीत!

वेगळ्या चुली मांडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.त्यानुसार बीडमध्ये राष्ट्रवादीने आता स्वतंत्रपणे जुळवाजुळव करत नगराध्यक्षपद रिपाइंला देण्याबाबत चाचपणी सुरु केली आहे. तसेच, शिवसेना आणि शिवसंग्रामला सोबत घेत नगरसेवक पदासाठीचे ५२ नगरसेवकही जुळविले आहेत. दुसरीकडे डॉ. योगेश क्षीरसागर यांनीही जनता आघाडीची नोंदणी अगोदरच करत भाजपला सोबत घ्यायचे का?, याची चाचपणी सुरु केली आहे.

१. राष्ट्रवादी आणि डॉ. योगेश क्षीरसागर यांच्यात मतभेद का झाले?

नेतृत्व व उमेदवारींच्या निर्णयाधिकारावरून दोघांमध्ये संघर्ष निर्माण झाला.

२. राष्ट्रवादीची पुढील निवडणूक रणनीती काय आहे?

रिपाइंला नगराध्यक्ष, शिवसेना-शिवसंग्रामला सोबत घेऊन ५२ उमेदवारांवर स्वतंत्र लढण्याची तयारी आहे.

३. डॉ. क्षीरसागर कोणते पर्याय तपासत आहेत?

ते जनता विकास आघाडीमार्फत किंवा भाजपसोबत आघाडीच्या चर्चेत आहेत.

४. नगरपालिका निवडणुकीत काय घडू शकते?

दोन्ही बाजूंनी वेगळ्या चुली मांडल्याने कठीण त्रिकोणी किंवा चौकोनी लढत निर्माण होण्याची शक्यता आहे.

# निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे -जिल्हाधिकारी

बीड, (दिव्य न्युज):- राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र शासन यांनी राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतीमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम- २०२५ दिनांक ०४.११.२०२५ रोजी घोषित केला असून बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई या नगरपरिषदा सार्वत्रिक निवडणूका कार्यक्रमात समाविष्ट आहेत. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहीता अंमलात आलेली आहे. त्यानुसार बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई या नगरपरिषदाच्या निवडणूका शांततेत व खुल्या वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली दि.४ नोव्हेंबर ला निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची बैठक घेऊन मार्गदर्शन केलेले आहे. त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख यांची बैठक दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात येऊन सदर बैठकीत आदर्श आचार संहितेचे पालन करणे व प्रभावीपणे अंमलबजावणी करणे बाबत तसेच कायदा व सुव्यवस्थेचे पालन करणे बाबत आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत.



बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई या नगरपरिदांच्या सार्वत्रिक निवडणुका शांततेत व खुल्या वातावरणात पार पाडण्यासाठी खालील मुद्यांच्या अनुषंगाने आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.शासकीय/निमशासकीय कार्यालये/विश्रामगृहे इ. परिसरात मिरवणुका काढणे, घोषणा देणे व सभा घेणे इ. बाबींबाबत निर्बंध, सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंधक कायद्याअंतर्गत कार्यवाही करणे.उमेदवारांचे नामनिर्देशन दाखल करतेवेळी अवलंब करण्याची कार्यपद्धती. नमुना मतपत्रिका छपाईवर निबंध घालणेबाबत. धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध,धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास निबंध घालणे. मोटारगाड्या वाहनांचा ताफ्याचा वापर करण्यास निर्बंध घालण्याबाबत.

पान १ वरून

## पण मुंडे, धस यांची

नगरपालिका, पंचायत समिती निवडणुका जाहीर झाल्यानंतर जिल्ह्यात वेगवान हालचाली सुरू झाल्या आहेत. प्रमुख नेते हे पक्षप्रवेश आणि उमेदवार ठरवण्यासाठीच्या बैठकांमध्ये व्यक्त आहे. जिल्ह्यात महायुती म्हणून एकत्र लढायचे की स्वबळावर याचाही निर्णय अद्याप झालेला नाही. भाजपने ज्या पंकजा मुंडे, सुरेश धस यांच्यावर निवडणुक प्रभारी आणि प्रमुख म्हणून जबाबदारी सोपवली आहे, ते सुद्धा अद्याप एकत्र बसलेले नाहीत. त्यामुळे

भाजपच्या गोटात काहीसे नाराजीचे वातावरण आहे.

नगर पालिका निवडणुकीची रणधुमाळी तशी सुरुच झाली म्हणायला हरकत नाही. नाही म्हणता आता भाजपलाही वातावरण पोषक होत आहे. मात्र, पक्षातील दोन प्रमुख नेते आणि पक्षाने निवडणुक प्रभारी व निवडणुक प्रमुख म्हणून जबाबदारी सोपविलेले मंत्री पंकजा मुंडे व आमदार सुरेश धस यांच्यात अद्याप तरी समन्वय बैठक वा नियोजनाच्या रणणिती आणि तयारीबाबत बैठक झालेली नाही. पंकजा मुंडे दोन दिवसांपासून जिल्ह्यात आहेत. धसांनी मात्र निवडणुक असलेल्या क्षेत्रात एन्ट्रीच केलेली नाही.बीड जिल्ह्यातील बीड, परळी, माजलगाव, गेवराई, धारुर व अंबाजोगाई या सहा नगर पालिकांच्या निवडणुका होत आहेत. बीड वगळता चार नगर पालिकांमध्ये महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप यांच्यातच समोरा समोर लढत होणार आहे. तर, बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष प्रमुख प्रतिस्पर्धी मानले जात आहेत.

परळीत भाजप -राष्ट्रवादी काँग्रेस युतीवर खल सुरुच आहे. दरम्यान, भाजपने अंबाजोगाईत नंदकिशोर मुंदडा, गेवराईत गीता पवार यांची नावे निश्चित केली आहेत. उर्वरित ठिकाणीही चाचपणी सुरु आहे. या दोन नगर पालिकांसह धारुर, माजलगावमध्येही पक्षाने चांगली मोट बांधली आहे. मुंडे यांनी परळीचा आढावा घेत बुधवारी बीडलाही चाचपणी केली.मात्र, निवडणुकीच्या दृष्टीने रणनिती ठरविणे, उमेदवारांची यादी निश्चित करणे, रपचाराचे नियोजन याबाबत पक्षाने नेमलेल्या निवडणुक प्रभारी पंकजा मुंडे व निवडणुक प्रमुख सुरेश धस यांच्यात मात्र अद्यापही बैठक झालेली नाही. दिवस थोडे आणि सोंग फार अशा वळणावर निवडणुक होत असताना आणखीही एकमेकांचे विरोधक नेते निवडणुकीत जवळ कधी येणार याकडे भाजपजनांचे डोळे लागले आहेत.

## मुख्यमंत्रिपद

असले तरी त्यांना मुख्यमंत्रिपद मिळेलच याची शाश्वती नाही. त्यांच्या पक्षाने आपल्या अधिकृत अकाऊंटवरून निकाल येताच 'नितीश कुमार कल मुख्यमंत्री थे, आज भी है और कल भी रहेंगे.' या लाईनसह नितीश कुमाराचा फोटो शेअर केला होता. मात्र, अवघ्या दहा मिनिटांमध्येच तो डिलिट केला. त्यामुळे नितीश कुमार यांच्या पक्षाची हतबलता दिसून येत असून त्यांना मुख्यमंत्रिपद मिळणार नसल्याची चर्चा आहे.'पलटी' मारण्यात माहीर असलेल्या नितीश कुमारांची या निकालामुळे मोठी कोंडी झाली आहे. कारण भाजपची साथ सोडून ते विरोधी पक्षांसोबत जाऊनही सत्ता स्थापन करू शकत नाही. कारण महागठबंधनला अवघ्या २८ जागा मिळताना दिसत आहे. त्यामुळे जेडीयू आणि महागठबंधन युती जरी झाली तरी त्यांना बहुमताचा आकडा गाठण्यासाठी ९ आमदार कमी पडत आहेत.

महागठबंधनने तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार जाहीर केले होते. मात्र, एनडीएने मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केला नव्हता. मात्र, एनडीएचे नेते आम्ही नितीश कुमार यांच्या नेतृत्वात निवडणूक लढत असल्याचे सांगितले होते. त्यामुळे नितीश कुमार हे मुख्यमंत्री असतील असा दावा जेडीयूचे नेते करत आहे. तर, सर्वाधिक जागा भाजपला मिळत असल्याने भाजपचा मुख्यमंत्री व्हावा, असा दावा

## 'मटका किंग'

कमिशनवर मटका खेळवित असल्याचे आणि जमा झालेली रक्कम गणेश खराडे व शेख चाँद यांच्याकडे देत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पाचही आरोपींवर केज पोलिस ठाण्यात स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले.या मोहिमेत पोलिस उपनिरीक्षक सुकुमार उर्फ राकेश बनसोडे, संजय फड, खेलबुडे, खंदारे, केदार, नागरगोजे आणि संतोष गित्ते यांचा समावेश असलेल्या पथकाने सहभाग घेतला.

## तहसीलदारांच्या

गोरे, मंडळ अधिकारी सुभाष गोरे, महसूल सहाय्यक दिलीप गालफाडे, महसूल शिपाई कुंदन बावरे तसेच पंच सुरज कोकणे व धनु गावडे सहभागी होते. पथक जेसीबी व ट्रॅक्टर जप्त करून आष्टी तहसील कार्यालयाकडे येत असताना, क्रेटा, बुलेरो आणि स्विफ्ट कारमधून आलेल्या काही व्यक्तींनी गाडी आडवी लावून पथकावर हल्ला केला.जेसीबी चालकाने तलाठी सचिन तेलंग यांच्यावर वाहन चढवण्याचा प्रयत्न केला.हल्लेखोरांनी तलाठी प्रविण शिंदे यांना दमदाटी करून एक ट्रॅक्टरचे हेड जबरदस्तीने पळवून नेले.शेवटी पथकाने जेसीबी चालक महेश संभाजी आस्वर (रा.वाकी) याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.या घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक विक्रांत हिंगे हे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहेत.

# धीरज वडमारे प्रभाग १४ मधून निवडणूक लढवण्याच्या तयारीत



बीड, (दिव्य न्युज):- शहरातील सर्वसामान्य जनतेच्या संपर्कात असणारा कार्यकर्ता धीरज वडमारे हे गवई गटाकडून प्रभाग क्रमांक १४ मधून निवडणूक लढवणार आहेत. त्यांची पक्षाने उमेदवारी निश्चित केली आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गट बीड शहराध्यक्ष सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्ता धीरज वडमारे यांची प्रभाग क्रमांक १४ मधून नावाची घोषणा करण्यात आली. यामुळे सामान्य पण प्रत्येकाच्या मदतीला धावून जाणारा कार्यकर्ता असल्याची चर्चा सुरू झाली आहे. या नावाची घोषणा जिल्हाध्यक्ष बाळासाहेब काकडे यांनी केली.